# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पभूचे पकटीकरण सोहळा

## सांयप्रार्थना

*महत्वाची सूचना ः खिस्तसभेची प्रार्थना किंवा बिविअरी प्रार्थना हा प्रकार खूप प्राचीन आहे. मठवासी धर्मगुरूंकडून आलेली ही प्रार्थना चर्च आपली अधिकृत प्रार्थना म्हणून मानते. सदर प्रार्थनेचं एक महत्वाचं वैशिष्टय म्हणजे ही संपूर्ण प्रार्थना बायबलवर आधारीत आहे. धर्मगुरू धर्मभगिनी तसेच अनेक प्रांपचिक ही प्रार्थना नित्यनेमाने करीत असतात. आपल्या संपूर्ण कुटुंबाला एकत्रित करून आपण ही प्रार्थना करावी. चिंतन व गरजेनुसार विनंत्या ह्या प्रार्थनेमध्ये अंतर्भूत करता येतील. खिस्त सभेची ही महत्वाची प्रार्थना करण्यापूर्वी घरात प्रार्थनामय वातावरण तयार करा. टिव्ही मोबाईल बंद करा घरातल्या राजपिठासमोर मेणबत्त्या लावा प्रार्थनेला योग्य असे कपडे करा व आपल्या कुटुंबासाठी हा एक भक्तीमय सोहळा बनवा. खिस्तसभेची ही महत्वाची प्रार्थना आपणांस सतत प्रेरणा देत राहो.*

**चरण:** हे देवा, आमच्या सहाय्यास ये.

**प्रतिसाद:** हे प्रभो, माझ्या सहाय्यास धावून ये.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**गीत ः** नाताळ गीत

**प्रतिगीत १:** शांतीचा राजा हा पृथ्वीवरील इतर सर्व राजांपेक्षा अधिक वैभवशाली आहे.

**स्तोत्र ११० : १ - ५, ७**

माझ्या प्रभूला परमेश्वर म्हणतो,
मी तुझे वैरी तुझे पदासन करीपर्यंत तू माझ्या उजवीकडे बैस.

परमेश्वर तुझे बलवेत्र सियोनेतून पुढे नेईल;
तो म्हणतो, तू आपल्या शत्रूवर प्रभुत्व कर.

तुझ्या पराक्रमाच्या दिवशी तुझे लोक संतोषाने पुढे होतात,
पावित्र्याने मंडित झालेले तुझे तरूण
तुला पहाटेच्या दहिवरासारखे आहेत.

परमेश्वराने शपथ वाहिली आहे
आणि ती तो बदलणार नाही;
ती अशी की, मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे तू युगानुयुग याजक आहेस.

तुझ्या उजव्या हाताकडे असलेला प्रभू
आपल्या क्रोधाच्या दिवशी राजांचा बीमोड करील;

मार्गाने चालत असता तो ओहोळातले पाणी पिईल;
आणि आपले डोके वर करील.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत १: शांतीचा राजा हा पृथ्वीवरील इतर सर्व राजांपेक्षा अधिक वैभवशाली आहे.

*******

प्रतिगीत २: प्रामाणिक माणसांसाठी अंधारात एक तारा लुकलुकत आहे. प्रभू कृपाळू, दयाळू आणि ममताळू आहे.

स्तोत्र ११२

परमेश्वराचे स्तवन करा.
जो मनुष्य परमेश्वराचे भय धरतो आणि
ज्याचा हर्ष त्याच्या आज्ञांमध्ये आहे तो धन्य!
त्याची संतती पृथ्वीवर पराक्रमी होईल;
सरळ जनांचा वंश आशीर्वादयुक्त होईल.

धनसंपदा त्याच्या घरी असते;
त्याचे नीतिमत्त्व सर्वकाळ टिकते.
सरळ जनांस अंधकारात प्रकाश प्राप्त होतो.
त्याच्याठायी कृपा, दया व न्याय ही आहेत.

जो मनुष्य दया करितो व उसने देतो
त्याचे कल्याण होते;

तो न्यायाने आपले व्यवसाय करील.
तो कधीही ढळणार नाही;
नीतिमानाचे स्मरण सर्वकाळ राहील.

**तो** वाईट बातमीला भिणार नाही;
त्याचे मन परमेश्वरावर भाव ठेवून अढळ राहते.
त्याचे मन स्थिर असते,
आपल्या शत्रूंची गत आपल्या इच्छेप्रमाणे झालेली पाहीपर्यंत
तो भिणार नाही.

**त्या**ने सढळ हाताने गरिबांस दान दिले आहे;
त्याचे नीतिमत्त्व सर्वकाळ राहील.
त्याचा सन्मानपूर्वक उत्कर्ष होईल.

**हे** पाहून दुर्जन खिन्न होईल;
तो दातओठ खाईल पण विरघळून जाईल.
दुर्जनांची इच्छा नष्ट होईल.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत २: प्रामाणिक माणसांसाठी अंधारात एक तारा लुकलुकत आहे. प्रभू कृपाळू, दयाळू आणि ममताळू आहे.

******

प्रतिगीत ३: तू निर्माण केलेले सर्व लोक तुझ्याकडे येतील आणि तुला नमन करतील.

काव्य - प्रकटी १५ : ३ - ४

**हे** 'प्रभू' देवा, हे सर्वसमर्था, तुझी कृत्ये थोर व आश्चर्यकारक आहेत;
हे राष्ट्राधिपते, 'तुझे मार्ग नीतीचे व सत्य आहेत.'

'**हे** प्रभो, तुला कोण भिणार नाही?
तुझ्या नांवाला कोण महिमा देणार नाही?'
कारण तूच मात्र 'पवित्र' आहेस;
आणि तुझी न्यायकृत्ये प्रगट झाली आहेत,
म्हणून 'सर्व राष्ट्रे तुझ्यासमोर येऊन तुला नमन करितील.'

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत ३:** तू निर्माण केलेले सर्व लोक तुझ्याकडे येतील आणि तुला नमन करतील.

**शास्त्रवाचन** तीत ३:४ - ५

जेव्हा आपला तारणारा देव ह्याची दया व मनुष्यावरील प्रेम प्रगट झाले तेव्हा आपण केलेल्या नीतीच्या कृत्यांनी नव्हे तर नव्या जन्माचे स्नान व पवित्र आत्म्याने केलेले नवीकरण ह्यांच्याद्वारे त्याने आपल्या दयेनुसार आपणास तारिले.

**लघु प्रतिसाद**

प्रतिसाद: सर्व लोकांना त्याच्याकडून आशीर्वाद मिळेल.
प्रतिसाद: सर्व लोकांना त्याच्याकडून आशीर्वाद मिळेल.
चरण: सर्व राष्ट्रे त्याचे स्तवन करतील.
प्रतिसाद: सर्व लोकांना त्याच्याकडून आशीर्वाद मिळेल.
त्रैक्य स्तुती: पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
प्रतिसाद: सर्व लोकांना त्याच्याकडून आशीर्वाद मिळेल.

**मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत :** आजच्या दिवशी आपण तीन घटना साजऱ्या करीत आहोत : आज ताऱ्याचा मागोवा घेत ज्ञानी पुरूष गव्हाणीपर्यंत पोहोचले, आज काना येथील लग्नाच्या मेजवानीत पाण्याचे द्राक्षारसात रूपांतर झाले आणि आपले तारण करण्यासाठी आज येशूने योहानाच्या हातून बाप्तिस्मा घेण्याची इच्छा दर्शविली.हे, व त्याची आम्ही साक्ष देतो; ते सार्वकालिक जीवन पित्याजवळ होते व आम्हास प्रगट झाले, ते तुम्हास कळवितो. जे आम्ही पाहिले आहे व ऐकले आहे, ते तुम्हासही ह्यासाठी कळवितो की तुम्हीही आमच्याशी सहभागी व्हावे; आपली सहभागिता तर पित्यावरोवर व त्याचा पुत्र येशू ख्रिस्त ह्याच्यावरोवर आहे.

**मरियेचे स्तोत्र:** लूक १:४६-५५

'माझा जीव प्रभूला' थोर मानितो
आणि 'देव जो माझा तारणारा'
त्याच्यामुळे माझा आत्मा 'उल्हासला आहे;'

कारण 'त्याने' आपल्या 'दासीच्या दैन्यावस्थेचे अवलोकन केले आहे.'
पाहा, आतापासून सर्व पिढया मला धन्य म्हणतील;

कारण जो समर्थ आहे,
त्याने माझ्याकरिता महत्कृत्ये केली आहेत;
आणि 'त्याचे नांव पवित्र आहे,'
आणि जे 'त्याचे भय धरितात,
त्यांच्यावर त्याची दया पिढयान्‌पिढया आहे.'

त्याने आपल्या बाहूने पराक्रम केला आहे;
जे आपल्या अंत:करणाच्या कल्पनेने 'गर्विष्ठ आहेत
त्यांची त्याने दाणादाण केली आहे.'

'त्याने अधिपतींस' राजसनांवरून 'ओढून काढिले आहे,'
'त्याने भुकेलेल्यांस उत्तम पदार्थांनी तृप्त केले आहे,'
व 'धनवानांस रिकामे लावून दिले आहे.'

आपल्या पूर्वजांस' त्याने सांगितले 'त्याप्रमाणे आब्राहाम'
व त्याचे 'संतान ह्यांच्यावरील दया' सर्वकाळ 'स्मरून
त्याने आपला सेवक इस्त्राएल ह्याला साहाय्य केले आहे.'

पिता पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
जसा प्रारंभी होता तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत :** आजच्या दिवशी आपण तीन घटना साजऱ्या करीत आहोत : आज ताऱ्याचा मागोवा घेत ज्ञानी पुरूष गव्हाणीपर्यंत पोहोचले, आज काना येथील लग्नाच्या मेजवानीत पाण्याचे द्राक्षारसात रूपांतर झाले आणि आपले तारण करण्यासाठी आज येशूने योहानाच्या हातून बाप्तिस्मा घेण्याची इच्छा दर्शविली.हे, व त्याची आम्ही साक्ष देतो; ते सार्वकालिक जीवन पित्याजवळ होते व आम्हास प्रगट झाले, ते तुम्हास कळवितो. जे आम्ही पाहिले आहे व ऐकले आहे, ते तुम्हासही ह्यासाठी कळवितो की तुम्हीही आमच्याशी सहभागी व्हावे; आपली सहभागिता तर पित्याबरोबर व त्याचा पुत्र येशू ख्रिस्त ह्याच्याबरोबर आहे.

## विनंत्या

**प्रतिसाद:** प्रभो, आमच्या संकटात आमचा बचाव कर.

**आ**ज मागी लोकांनी आपल्या तारणाऱ्याला गुडघे टेकून नमन केले. आपणदेखील आनंदाने त्याची आराधना करू या आणि त्याच्याकडे प्रार्थना करू या. **प्रतिसाद:** प्रभो, आमच्या संकटात आमचा बचाव कर.

**हे** सर्व राष्ट्रांच्या राजा, ज्ञानी लोक पूर्वेकडून तुला नमन करण्यासाठी आले - आमच्याठायी अस्सल भक्तिभाव आणि समर्पणवृत्ती वाढीस लाव. **प्रतिसाद:** प्रभो, आमच्या संकटात आमचा बचाव कर.

**हे** वैभवशाली राजा, तुझी प्रजा तुझ्याकडून न्यायाची अपेक्षा करीत आहे. - आमच्या जगाला विपुल शांतीचे वरदान दे. **प्रतिसाद:** प्रभो, आमच्या संकटात आमचा बचाव कर.

**हे** सर्व युगांच्या राजा, तुझे वचन सर्वकाळ सामर्थ्यशाली असते - ते आज आमच्या हृदयात आणि जीवनात खोलवर रूजू दे. **प्रतिसाद:** प्रभो, आमच्या संकटात आमचा बचाव कर.

**हे** न्याय-नीतीच्या राजा, गोरगरीब आणि कंगाल लोकांना तुझ्या प्रेमाचे दर्शन घडव - दु:खितांना सहनशीलता दे. **प्रतिसाद:** प्रभो, आमच्या संकटात आमचा बचाव कर.

**हे** स्वर्गाच्या राजा, तुझ्यावर श्रद्धा ठेवणाऱ्यांची तू आशा आहेस - आमच्या मृत भाविकांना तुझ्या तारणाच्या अद्‌भुत प्रकाशाचे दर्शन घडव. **प्रतिसाद:** प्रभो, आमच्या संकटात आमचा बचाव कर.

**आ**मच्या स्वर्गीय बापा ...

## समारोपाची प्रार्थना:

हे प्रभो, ताऱ्याच्या प्रकाशाने तू जगाला तुझ्या पुत्राच्या जन्माची शुभवार्ता कळवलीस. श्रद्धेच्या प्रकाशाने आम्हाला स्वर्गीय वैभवाचे दर्शन घडव. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात, सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

## समारोप विधी:

प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

**प्रतिसाद:** आमेन.